**राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकरीता पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-२ मधील सर्व अंतर्भुत बाबींचा समावेश करुन सर्वसमावेशक व एकसमान पथविक्रेता योजनेचा मसुदा तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यास व पथविक्रेता योजना अधिसूचित करण्याबाबत समितीने अवलंबावयाची कार्यपद्धती निश्चित करण्यास मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२६/प्र.क्र.२०४/नवि-२१**
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २० एप्रिल, २०२६.

**वाचा** :- १) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. बीएमसी-२५१६/ प्र.क्र.१५१९/ २०१६/ नवि-२१, दिनांक ०९ जानेवारी, २०१७.
२) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ रोजी दिलेले आदेश
३) मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी रिट याचिका क्र.३८९०/२०२१ मध्ये दिनांक २६ मार्च, २०२६ रोजी दिलेले आदेश.
४) सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई यांचे पत्र क्रमांक न.प्र.सं./फेरीवाला धोरण/का.१०/I/२२२५६५८/२०२६, दिनांक १३ एप्रिल, २०२६.

**प्रस्तावना :-**

केंद्र शासनाने पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ प्रसिद्ध केला आहे. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ येथे नमूद नगर विकास विभाग, शासन निर्णय दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ तयार करण्यात आली आहे. तद्नंतर मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्रमांक ६५२/२०१७ मध्ये मा.न्यायालयाने संदर्भाधिन क्र.२ दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१७ च्या आदेशान्वये दिनांक ९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये तयार केलेली पथविक्रेता योजना ही पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३८ नुसार नगर पथविक्रेता समिती व स्थानिक प्राधिकरण यांच्याशी सल्लामसलत न करता तयार केलेली असल्याने, सदर योजना रद्द करण्याचे आदेश दिले. तथापि दिनांक ९ जानेवारी, २०१७ रोजी निर्गमित केलेली पथविक्रेता योजना ही

मार्गदर्शक योजना म्हणून वापरता येईल, असेही मा.उच्च न्यायालयाने वरील आदेशामध्ये सूचित केले.

सद्य:स्थितीत राज्यातील नागरी स्वराज्य संस्थेकडून संदर्भाधिन क्र.१ दिनांक ९ जानेवारी, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेली पथविक्रेता (उपजिविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) योजना, २०१७ ही मार्गदर्शक योजना विचारात घेण्यात येत असून त्या आधारे नागरी स्वराज्य संस्थेच्या पातळीवर पथविक्रेता योजना तयार करण्यात येत आहे. तथापि, मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र.३८९०/२०२१ मध्ये दिनांक २६ मार्च, २०२६ रोजी झालेल्या सुनावणीमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये तयार करण्यात आलेल्या पथविक्रेता योजनेमध्ये पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-२ मधील अंतर्भूत बाबींचा समावेश नसल्याचे नमूद केले आहे. त्यानुसार उक्त दिनांक ९ जानेवारी २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित करण्यात आलेल्या योजनेमध्ये दोन सर्वेक्षणादरम्यान विक्री प्रमाणपत्र प्रदान करण्याची तरतुद, पथविक्रेत्यालस प्रत्यक्ष निष्कासित करण्याची पद्धत, पथविक्रेत्याचा माल जप्त करणे व परत मिळवण्याची तरतुद, पथविक्रेत्यांचे स्थलांतर करण्याची पद्धत, सामाजिक अंकेक्षण इत्यादी बाबींचा समावेश नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकरीता पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-२ मधील सर्व अंतर्भुत बाबींचा समावेश करुन सर्वसमावेशक पथविक्रेता योजनेचा मसुदा तयार करणे आवश्यक आहे. तसेच इतर राज्यांच्या पथविक्रेता योजनेंचाही अभ्यास करून त्यामधील आवश्यक बाबी योजनेमध्ये अंतर्भूत करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सर्वसमावेशक व एकसमान पथविक्रेता योजनेचा मसुदा तयार करण्यासाठी समिती गठीत करणे, कार्यकक्षा निश्चित करणे व पथविक्रेता योजना अधिसूचित करण्याबाबत समितीने अवलंबावयाची कार्यपद्धती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :-</u>

राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकरीता पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-२ मधील सर्व अंतर्भुत बाबींचा समावेश करुन सर्वसमावेशक व एकसमान पथविक्रेता योजनेचा मसुदा तयार करण्याकरीता समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे आहे :-

| अ.क्र. | नाव व पदनाम | समितीमधील पद |
|---|---|---|
| १. | आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई. | अध्यक्ष |
| २. | सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, नवी मुंबई. | सदस्य |
| ३. | उपायुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई. | सदस्य |
| ४. | उपायुक्त, नागपूर महानगरपालिका, नागपूर | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ५. | उपायुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे | सदस्य |
| ६. | उपायुक्त, छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका, जि.छत्रपती संभाजीनगर | सदस्य |
| ७. | अतिरिक्त आयुक्त, मालेगाव महानगरपालिका, जि.नाशिक | सदस्य |
| ८. | मुख्याधिकारी, बदलापूर नगरपरिषद, जि.ठाणे | सदस्य |
| ९. | मुख्याधिकारी, खामगाव नगरपरिषद, जि.बुलढाणा | सदस्य |
| १०. | मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद, जि.रायगड | सदस्य |
| ११. | मुख्याधिकारी, वाडा नगरपंचायत, जि.ठाणे. | सदस्य |
| १२. | उपायुक्त, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर, नवी मुंबई. | सदस्य सचिव |

२. पथविक्रेता योजनेचा मसुदा अंतिम करणेकरीता गठीत समितीची कार्यकक्षा खालीलप्रमाणे असेल:-

अ. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-२ मधील नमूद तरतुदींचा अभ्यास करून संदर्भाधिन क्र.१ दि.९ जानेवारी, २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित केलेल्या पथविक्रेता योजनेमध्ये समाविष्ट नसलेल्या बाबीं स्पष्ट करणे.

ब. पथविक्रेता (उपजीविकेचे संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ मधील कलम ३८ व अनुसूची-दोन नुसार पथविक्रेता योजनेमधील सर्व बाबीं समाविष्ट झाल्याची व त्या बाबीं स्वयंस्पष्ट असल्याची खात्री करणे.

क. इतर राज्यांच्या पथविक्रेता योजनेमधील अंतर्भुत तरतुदींचा अभ्यास करून त्या राज्याच्या पथविक्रेता योजनेमध्ये समाविष्ठ करण्याबाबतची कार्यवाही करणे.

ड. समितीने १ महिन्याच्या कालावधीमध्ये पथविक्रेता योजनेचा मसुदा अंतिम करावा.

३. पथविक्रेता योजना अधिसूचित करण्याबाबत समितीने अवलंबावयाची कार्यपद्धती खालीलप्रमाणे राहील :-

अ. शासन मान्यतेनंतर पथविक्रेता योजनेचा मसुदा स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांच्या सल्लामसलतीसाठी पाठविण्यात येईल. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी नामनिर्देशित पथविक्रेता समिती स्थापन करून त्यांच्या देखरेखेखाली पथविक्रेता सर्वेक्षण करून पथविक्रेत्यांची निवडणूक घेऊन नगर पथविक्रेता समिती अधिसूचित करणे आवश्यक राहील. ज्या ठिकाणी सदर कार्यवाही पूर्ण झालेली आहे, त्यांनी पथविक्रेता योजनेच्या मसुद्यावर स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांच्याशी सल्लामसलत करुन सदर योजनेबाबतच्या हरकती व सूचना सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार समितीकडे त्वरित सादर करण्यात येतील.

ब. ज्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नामनिर्देशित पथविक्रेता समिती स्थापन करून त्यांच्या देखरेखेखाली पथविक्रेता सर्वेक्षण करून पथविक्रेत्यांची निवडणूक घेऊन नगर पथविक्रेता समिती अधिसूचित करण्याची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही, त्यांनी सदर प्रक्रिया पुर्ण करुन या शासन निर्णयाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत पथविक्रेता योजनेच्या मसुद्यावर स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांच्याशी सल्लामसलत करुन सदर योजनेबाबतच्या हरकती व सूचना सोबतच्या परिशिष्ट-अ नुसार समितीकडे सादर करणे आवश्यक राहील.

क. पथविक्रेता योजना मसुद्यावर सल्लामसलत करून ज्या संबंधीत स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांच्याकडून वरीलप्रमाणे विहित केलेल्या कालावधीमध्ये हरकती व सूचना प्राप्त होणार नाहीत, तर त्या स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांना पथविक्रेता योजना मान्य आहे, असे गृहीत धरण्यात येईल.

ड. उपरोक्त गठीत समितीने सदर कालावधी पूर्ण झाल्यांनतर पुढील एक महिन्यामध्ये स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समिती यांच्याकडून प्राप्त हरकती व सूचना यांच्या आधारे राज्याची एक पथविक्रेता योजना तयार करून ती अधिसूचित करण्यासाठी शासनाच्या मान्यतेस्तव सादर करणे बंधनकारक असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०४२०१३१८२७७१२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIDYA RAMAPPA HAMPAYYA

Digitally signed by VIDYA RAMAPPA HAMPAYYA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=7b40f543d9d95d4cad6707bb7eae1089289d9878b7cb34418f111566e3223ba1, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A94EF1B631F4673B829AC9ADBEB5B0DDABD086A7544E3FDF47CD7A011FF7EA40, cn=VIDYA RAMAPPA HAMPAYYA
Date: 2026.04.20 13:20:36 +05'30'

**(विद्या हम्पय्या)**
**शासनाचे सह सचिव**

**प्रत,**

१) मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) मा.उपमुख्यमंत्री महोदय (नगर विकास व गृहनिर्माण) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री महोदय (राज्य उत्पादन शुल्क, क्रिडा व युवक, अल्पसंख्याक व ऑकाफ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) महोदया यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (नवि-२) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, ७ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.
७) निवडनस्ती (नवि-२१).

# परिशिष्ट – अ

प्रति,

अध्यक्ष, पथविक्रेता योजना मुसदा समिती तथा,
आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
७ वा मजला, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई.

**विषय: स्थानिक प्राधिकरण व नगर पथविक्रेता समितीशी सल्ला मसलत करून पथविक्रेता योजनेबाबत हरकती व सूचना सादर करणेबाबत**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयान्वये पथविक्रेता योजना मसुदा समितीद्वारे पाठविण्यात आलेल्या पथविक्रेता योजना मसुद्याबाबत दि. / /२०२६ तारखेला नगर पथविक्रेता समिती यांच्याशी सल्ला मसलत करण्यात आली व दि. / /२०२६ तारखेला स्थानिक प्राधिकरण यांच्याशी सल्ला मसलत करण्यात आली. त्यानुसार पुढील प्रमाणे हरकती / सूचना सादर करण्यात येत आहेत.

पथविक्रेता योजनेच्या मसुद्यावर नगर पथविक्रेता समिती व स्थानिक प्राधिकरण यांच्याशी केलेल्या सल्ला मसलतीमधून कोणत्याही प्रकारच्या हरकती व सूचना आलेल्या नाहीत. सदर पथविक्रेता योजना आम्हाला मान्य आहे.

**किंवा**

पथविक्रेता योजनेच्या मसुद्यावर नगर पथविक्रेता समिती व स्थानिक प्राधिकरण यांच्याशी केलेल्या सल्ला मसलतीमधून आलेल्या हरकती व सूचना पुढील प्रमाणे आहेत :-

१.
२.
३.
४.
५.

| | | |
|---|---|---|
| **सही/-** <br> **नगर पथविक्रेता समिती अध्यक्ष** | **सही/-** <br> **आयुक्त / मुख्याधिकारी** | **सही/-** <br> **महापौर / नगराध्यक्ष** |